# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

दूरध्वनी क्र. ०२०–२५६२२६६४, २५६२२६६६ ईमेल **directorsports@unipune.ac.in**

संदर्भ: विक्रीमं/शिबीर/५३२९ दिनांक: ०५ जुलै, २०२२

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था,**

**विषय: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर २०२२–२३ बाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त अनुसरून आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मधील ३५ वे शारीरिक शिक्षण संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या विद्यमाने व **संगमनेर नगरपालिका कला, डी जे मालपाणी वाणिज्य व बी एन सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर** या महाविद्यालयाच्या सौजन्याने **शुक्रवार, दि. २९ जुलै, २०२२ ते रविवार, दि. ३१ जुलै, २०२२ या कालावधीत मालपाणी रिसोर्ट** येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या चर्चासत्रास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न वरिष्ठ महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थामध्ये **पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना उपस्थित राहणे क्रमप्राप्त व** कार्यरत असतील संबंधितांना अनिवार्य रहाणार आहे.

या क्रीडा चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबतची माहिती आपल्या महाविद्यालयात पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या शारीरिक शिक्षण संचालकांना खालील सूचना निर्देशित करणे, ही विनंती.

**अ)** शारीरिक शिक्षण संचालक चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहण्याबद्दल संबंधित शारीरिक शिक्षण संचालकांचा दैनंदिन भत्ता, प्रवास खर्च व इतर अनुषांगिक खर्च हा नियमानुसार संबंधित महाविद्यालयास करावा लागेल. याबाबतची पूर्वपरवानगी मा. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे – १ यांचेकडून मिळालेली आहे. त्यासंबंधिची कागदोपत्री करण्यात येणारी पुर्तता शिबीर शेवटच्या दिनी सर्व सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल.

**ब)** चर्चासत्र व क्रीडा शिबीर मार्गदर्शनाचा कालावधी एकुण तीन दिवसांचा असेल. प्रत्येक शिबीरार्थीस नोंदणी शुल्क रू. ७५०/–(सातशे पन्नास रूपये फक्त) प्रतिदिनी याप्रमाणे रू. २,२५०/– (दोन हजार दोनशे पन्नास रूपये फक्त) व अनामत रक्कम म्हणून

रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) एकूण रू. ३२५०/— (तीन हजार दोनशे पन्नास रूपये फक्त) रक्कम सहभागी होणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांना **शुक्रवार, दि. २९ जुलै, २०२२** रोजी नावनोंदणी करतेवेळी चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर आयोजन करणाऱ्या महाविद्यालयाकडे रोख स्वरूपात जमा करणे क्रमप्राप्त राहील. सदर दोन्ही रक्कमेची रितसर पावती सहभागी शारीरिक शिक्षण संचालकांना देण्यात येईल. **दि. ३१ जुलै, २०२२** रोजी रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) अनामत रक्कमेची पावती सादर केल्यानंतर रू. १०००/— (एक हजार रूपये फक्त) शारीरिक शिक्षण संचालकास परतावा करण्यात येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

क) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरास उपस्थित राहणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांची निवास, नास्ता, चहापान, भोजन व आवश्यक स्टेशनरी संयोजन महाविद्यालयाकडून देण्यात येईल.

ड) **शुक्रवार, दि. २९ जुलै, २०२२** रोजी चर्चासत्राच्या ठिकाणी ठीक **दुपारी १२.०० वाजेपर्यंत** सर्व शारीरिक शिक्षण संचालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी शिबीरार्थीजवळ नाव नोंदणी करताना संबंधिताने आपण ज्या महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कार्यरत आहात व शिबीरास उपस्थित राहण्याबाबतचे **मा. प्राचार्यांचे/संचालकांचे संमतीपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.** अन्यथा संबंधित शारीरिक शिक्षण संचालकास सहभागी करता येणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती. **शुक्रवार, दि. २९ जुलै, २०२२** रोजी दुपारी ठिक १.०० वा शिबीरार्थींना चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराबाबत विशेष सूचना देण्यात येतील.

**टीप : सर्व शारीरिक शिक्षण संचालक (पुरूष/महिला) यांनी मालपाणी रिसोर्ट संगमनेर येथे उपस्थित राहावे.**

इ) **या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीराच्या कालावधीत कोणत्याही शारीरिक शिक्षण संचालकास खाजगी कामाकरीता अन्य ठिकाणी जाण्याची कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. शुक्रवार, दि. २९ जुलै, २०२२ ते रविवार, दि. ३१ जुलै, २०२२** या कालावधीत होणाऱ्या शिबीराच्या प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल तद्नंतरच संबंधित शिबीरार्थीस शिबीरास उपस्थितीबाबतचे **प्रमाणपत्र व कार्यमुक्ती आदेश (Reliving Order)** देण्यात येईल.

ई) चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीर **उद्घाटन** व **समारोपदिनी** प्रत्येक शारीरिक शिक्षण संचालकांकडे पूर्ण पांढरा गणवेश (पोशाख) असणे आवश्यक आहे. नसल्यास किमान पांढरा शर्ट/टी—शर्ट आवश्यक राहील. महिला शारीरिक शिक्षण संचालकांना पांढरा पंजाबी ड्रेस आवश्यक राहील.

उ) या चर्चासत्र व क्रीडा मार्गदर्शन शिबीरामध्ये विविध क्रीडाप्रकारांच्या नियमावलीची प्रात्यक्षिकासह माहिती त्या—त्या क्रीडा तज्ज्ञांनकडून देण्यात येणार आहे. तसेच नवीन

शैक्षणिक धोरण, शारीरिक शिक्षण संचालकांची भुमिका, शारीरिक शिक्षण संचालकांची कर्तव्य व जबाबदारी, शेल्डर इंज्युजरी, अॅरोबिक्स, झुंबा व योग प्रात्यक्षिके प्राणायम इत्यादी विषयी व्याख्याने व प्रात्यक्षिकासह आयोजन करण्यात येणार आहे.

महत्त्वाच्या सूचना :

१. शिबीरार्थींनी शिबीरास येताना **मौल्यवान वस्तु** अथवा **रोख रक्कम** ही स्वतःच्या जवाबदारीवर आणावी.

२. निवासाची व्यवस्था क्रीडा संचालकांना प्रत्येक रूममध्ये चार अथवा पाच व्यक्ती अशाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येईल.

३. **शुक्रवार, दि. २९ जुलै, २०२२** रोजी सकाळी ठीक ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत मालपाणी रिसॉर्ट, संगमनेर येथे स्वागत व नोंदणीकक्ष येथे उपस्थित राहावे.

४. प्रत्येक सहभागी शारिरीक शिक्षण संचालकांने **आपल्या महाविद्यालयांचे ओळखपत्र** सोबत आणावे.

५. **आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक सदर चर्चासत्र व क्रीडा मागदर्शन शिबीरास उपस्थित राहणार आहे किंवा नाही. याबाबत दि. २५ जुलै, २०२२ पर्यंत क्रीडा व शारीरिक शिक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पत्राद्वारे त्वरित कळविण्यात यावे, ही विनंती.**

कृपया सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांच्या निदर्शनास आणुन या शिबीरातील क्रीडा क्षेत्रातील आधुनिक बाबी आत्मसात करण्यासाठी आवश्य उपस्थित राहण्यास सांगावे. धन्यवाद! सहकार्याची अपेक्षा!

कळावे,

आपला,

**संचालक,**
**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ**

प्रत माहितीसाठीः—

१) मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
२) मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
३) मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
४) मा. सदस्य, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
५) मा. वित्त व लेखाधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
६) मा. जनसंपर्क अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
७) मा. प्राचार्य, संगमनेर नगरपालिका महाविद्यालय, संगमनेर
८) मा. शा. शि. संचालक, संगमनेर नगरपालिका महाविद्यालय, संगमनेर